# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 18/11/2014 (का.प.क्र.07) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक 18 नोव्हेंबर 2014 रोजी (का.प.क्र .07) मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.00 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला औरंगाबाद महानगरपालिका प्र.आयुक्त श्री.रमेश पवार नगरसचिव,श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
03. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
04. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
05. स.स.श्री.अनिल श्रीकिशन मकरीये
06. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
07. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
08. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
09. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
10. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
11. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
12. स.स.सौ.सत्यभामा दामोधर शिंदे
13. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

श्री.त्रिंबक तुपे : आचारसंहिता असल्याने अनेक दिवसानंतर बैठक होत आहे.वसुलीचा विषय महत्वाचा असून त्यावर चर्चा व्हावी. येणारे उत्पन्न किती व खर्च किती 2-3 महिण्यात वसुली कमी आलेली आहे का? 8-10 दिवसाच्या वृत्तपत्राच्या बातम्यातून वाचतो, ब-याच वस्तुवर एलबीटी माफ करण्यात आला.मिडीयाच्या माध्यमातून जे जे विषय समोर आलेले आहे त्यात रस्त्याचा विषय, समांतर लाईनचा विषय असेल खड्डयाचा विषय असेल यावर चर्चेसाठी वेळ देवून योग्य तो मार्ग काढावेत.त्यात रिलायन्सचा विषय असेल जीटीएलचा 30 कोटी सवलत बाबत विषय असेल हे सर्व विषय चर्चेला घ्यावेत.रिलायन्स कंपनीने 40 कोटी रक्कम दिली ती पगारासाठी वापरली का, निधी नसेल तर कशाच्या अधारे काम सुरू करणार आहे.मागिल वर्षा पेक्षा या वर्षाचे येणारे उत्पन्न किती आहे.उत्पन्न वाढले असेल तर येणा-या काळात कामे होऊ शकतात.उत्पन्न कमी मिळत आहे अशी माहिती आहे उत्पन्नाच्या उपाया बाबतीत काही सुचना मांडायच्या आहेत प्रशासनाचा वसुली संदर्भात अगोदर खुलासा घ्यावा त्यानंतर या विषयावर चर्चा व्हावी.

श्री.मीर हिदायत अली :वृत्तपत्रात बातम्या येतात महापालिकेचे बजेट खर्च झाले एलबीचे उत्पन्न कमी झाले. उत्पन्न का कमी येते यापुर्वी किती आले होते आता किती कमी आले याचा अगोदर खुलासा घ्यावा

श्री.सुरेंद्र कुलकर्णी. :किती उत्पन्न घटले.काही वार्डात वसुलीला जाण्याची गरज नाही तेथील नागरीक स्वत:हून कर भरतात टेक्नीकल अडचणी कर्मचारी जागेवर नसणे संगणक बंद असणे कर्मचारी बरोबर न बोलणे यामूळे नागरीक कर भरू शकत नाही.कर दात्यांना मागचे रेकॉर्ड आणण्याचे सांगतात करदात्यांना सन्मानपुर्वक वागणूक दिली पाहिजे.यामुळे वसुली कमी येते यावर योग्य तो निर्णय होणे अपेक्षीत आहे.

श्री.अनिल जैस्वाल :वार्ड ब कार्यालयात अनेक नागरीक स्वत:टॅक्स भरण्यासाठी येतात. यंत्रणा चांगली नसल्याने नागरीकांना रांगेत 3-4 तास ताटकळत उभे रहावे लागते. वार्ड अधिकारी कार्यालयात अनुपस्थित असतात.सायंकाळी 6 नंतर कार्यालयात येतात याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

मा.सभापती :एलबीटी चे उत्पन्न कमी झालेले आहे संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

एलबीटी प्रमुख :एलबीचे गेल्या वर्षीचे सहा महिण्याचे उत्पन्न 91.88 कोटी चालू वर्षाचे सहा महिण्याचे उत्पन्न 91.63 आहे सप्टेंबर 2013 मध्ये शासनाने 52 अॅटमवर एलबीटी माफ केली यामुळे 18 कोटी उत्पन्नाची घट झाली आहे. फेब्रुवारी मध्ये सोने चांदीवर 1 टक्का होते ते 0.10 टक्का प्रमाणे शासनाने केले त्यात 5.50 कोटीचे उत्पन्न कमी झाले. 15 ऑगस्ट 2014 पासून रहदारी फि उठवण्यात आली मागील वर्षी रहदारी फिस मधून 18.61 कोटी आलेले होते. चालू वर्षाचे 22 कोटीचे उद्दिष्ट होते विद्युत पुरवठा संदर्भात जीटीएल कंपनीकडून घ्यावयाच्या 2 टक्के एलबीटी माफ केले त्यामुळे 12 कोटीचे नुकसान झाले.मागिल वर्षी शासनाने 3 वेळेस काही वस्तुवर कर कमी केला मागच्या तुलनेत आजमितीस एकूण 23 लक्ष कमी आहे.

श्री.मीर हिदायत अली :शासनाने ज्या अॅटमवर दर कमी किंवा माफ केले त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली प्रशासनाने पाठपुरावा का केला नाही.

एलबीटी प्रमुख :52 अॅटमवर शासनाने कर माफ केला यात 18 कोटीचे नुकसान होत आहे शासनास तसे कळविले इतर महापालिकेपेक्षा औरंगाबाद महापालिकेत नियमीत कर भरतात तर शासनाने कमी केलेल्या अॅटमवरील एलबीटी उठवू नये असे कळविण्यात आले.सोने चांदीवर 1 टक्के प्रमाणे होते त्यात 0.10 टक्के शासनाने केले त्यात पुर्वीप्रमाणे 1 टक्का प्रमाणे वसुल करण्याची मुभा दयावी मागणी केली अद्याप मान्य झाले नाही.

श्री.संजय चौधरी :जीटीएल कंपनी एलबीटीची रक्कम बाकी आहे वसुल का केली नाही माहिती द्यावी.

एलबीटी प्रमुख :जीटीएल ला रू 20,02,18265 ची डिमांड नोटीस दिली त्या संदर्भात तत्कालीन आयुक्त मा.कांबळे साहेब यांचे समोर त्यांची सुनावणी झाली त्यांनी 15 दिवसाची मुदत मागीतली. पुन्हा सुनावणी झाली होती.निवडणुकीचा कालावधी होता आणि ही रक्कम वसुल करण्यासाठी जीटीएलला एमएसईबीकडे परवानगी घ्यायची होती. प्रशासनाकडून पत्र दिलेले आहे. आता सुनावणीच्या प्रोसेसमध्ये आहे.

श्री.संजय चौधरी :वसुली कोणाकडून करणार आहे जीटीएलचे काम बंद होणार आहे.

एलबीटी प्रमुख : जीटीएलचे जे डिपॉजीट आहे त्यातून देणेसाठी महावितरण कंपनीला पत्र देवू.

श्री.त्रिंबक तुपे :52 अॅटमवर किती उत्पन्न मिळणार होते

एलबीटी प्रमुख :प्रत्येक वर्षाला 18 कोटी उत्पन्न येत होते.

श्री.त्रिंबक तुपे :शासनाकडे पाठपुरावा केला दखल घेतली की नाही.आता एलबीटी रद्य करण्याचा विषय शासनासमोर आहे.आता येणारे उत्पन्न कशातून अपेक्षीत आहे प्रशासनाने पुर्व तयारी केली का ?

एलबीटी प्रमुख :शासनाने एलबीटी बंद केल्यास शासन अनुदान देणे संदर्भात कार्यवाही करेल.18 कोटी कमी येतील तसे शासनास कळविले आहे.

श्री.त्रिंबक तुपे :जीटीएल कंपनीकडे 20-22 कोटी थकबाकी आहे.एवढया रक्कमा थकीत असेल तर येणा-या काळात रस्त्याची कामे होतील असे वाटत नाही.मुख्य रस्त्या बरोबरच वार्डातील प्रलंबीत कामे थांबविता येणार नाही मोठया रस्त्याची 40-50 कोटीची बीले देणेसाठी निधी नाही तर वार्डातील कामे होणार की नाही.कोणतीही कामे थांबणार नाही असे म्हटले होते.आता कामे थांबलेली आहे.निवडणुका समोर आलेल्या आहे. कामे होण्यासाठी नियोजन करावे लागणार आहे.वार्डातील कामाचे बील मिळाले नाही म्हणून ठेकेदार पुढील काम करीत नाही ही परीस्थिती सर्वच वार्डात आहे चर्चा होते कार्यवाही होत नाही यासाठी ठोस निर्णय होण्याची गरज आहे.एलबीटी व्यतिरिक्त इतर टॅक्सच्या माध्यमातून कर वसुली वाढवावी लागणार आहे.अनेक कॉलनी, सोसायटी ,गुंठेवारी भाग अशा अनेक वसाहती वाढलेल्या आहेत तेथे अधिकारी कर्मचारी टॅक्स लावण्यास जात नाही 10-12 वर्षापुर्वी लागलेला टॅक्स तोच आजपर्यंत चालू आहे फेर सर्वे होत नाही.असेच चालणार असेल तर उत्पन्न वाढणार नाही कामेही होणार नाही.व्हाईट टॉपींग, ब्लॅक टॉपींगची कामे होतील विद्यूतचा हप्ता थांबला,बीओटीच्या अनेक योजना आहे त्याचे हप्ते मोठया रक्कमेचे आहे.तीही कामे व्हावी परंतु वार्डातील कोणतीही कामे थांबवू नये.मनपाच्या मालमत्ता जे सांस्कृतिक सामाजिक हॉल, दुकाने,मोकळया जागा असतील त्या भाडयाने दिल्यास तसेच मोबाईल टॉवर, होर्डिंगजच्या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळेल.प्रशासनाने उत्पन्न वाढविण्यावर भर द्यावा व विकास कामे व्हावीत हे अपेक्षीत आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :यापुर्वी एक ठराव आलेला होता की व्यापा-यांना रेडीरेकण प्रमाणे टॅक्स लावावा.अनेक मालमत्तास टॅक्स लागलेला नाही कर लावून घेण्यास नागरीक कार्यालयात चकरा मारतात.अशा मिळकतीस टॅक्स लावून घ्यावा आर आर बंधनकारक असा टॅक्स लावू नये.

श्री.काशिनाथ कोकाटे :वसुली व विकास कामा संदर्भात चर्चा होतच राहते.त्यानुसार कार्यवाहीचा निर्णय होत नाही.पुढील काही दिवसात पुरवणी बजेट येईल तरी सुध्दा कामे झाली नाही.प्रशासनाने माहिती देण्याचा प्रयत्न केला योग्य माहिती मिळत नाही.सन 2014-15 मध्ये विविध कराच्या माध्यमातून किती रक्कम जमा झाली, त्यातून विकास कामावर व कर्मचा-याचा झालेला खर्च किती, वसुली करणे आम्ही अडवले नाही टारगेट नुसार वसुली का होत नाही ही जबाबदारी प्रशासनाची आहे एलबीटी, मालमत्ता कर , होर्डिंग्ज, गार्डन व इतर माध्यमातून नोंव्हेंबर 2014 पर्यंत किती उत्पन्न जमा झाले.वसुलीकडे लक्ष न देता अधिका-यांच्या बदल्या शिवाय काही काम झाले नाही.उत्पन्न जमेच्या बाजुचा सर्व खुलासा हेडवाईज करावा.

मा.सभापती :उत्पन्न कमी कशामूळे झाले सर्व माहिती दयावी.

मुख्यलेखाधिकारी :सन 2014-15 मध्ये आतापर्यंत एकूण उत्पन्न 195 ोटी जमा झाले त्यात स्था.संस्था करातून ऑगस्ट पर्यंत 81.79 कोटी मालमत्ता कर 25.19 कोटी,नगररचना 19.06 कोटी,आरोग्य विभाग 25.31 लक्ष प्रांणि संग्रहालय 96 लक्ष,उदयान 53 लक्ष,मालमत्ता विभाग 1.80 कोटी पाणीपट्टी शहर 2.56 पाणीपट्टी जायकवाडी 15.20 लक्ष, शासकीय अनुदान 18.41 असे एकूण 195 कोटी जमा झाले.

श्री.काशिनाथ कोकाटे :बजेटनुसार किती मागे आहोत वार्ड अ ते फ मधील मालमत्ता, पाणीपट्टी व इतर उत्पन्न किती झाले सविस्तर सांगावे.

मुख्यलेखाधिकारी :वार्ड निहाय माहिती मागवून घेतली जाईल.एकूण बजेटनुसार 790 कोटीचे अपेक्षीत उत्पन्न होते.

श्री.काशिनाथ कोकाटे :गेल्या आठ महिण्यात आस्थापनेवर किती खर्च झाला.

मुख्यलेखाधिकारी :एप्रिल ते ऑगस्ट पर्यंत आस्थापना खर्च हा 56.48 कोटी ,ठेकेदाराची बीले दिली त्यावर 28 कोटी खर्च झाला.

श्री.काशिनाथ कोकाटे :अ ते फ वार्ड नुसार मालमत्ता व पाणीपट्टीचे किती उत्पन्न आले आहे.वार्ड अधिकारी यांचेकडून माहिती घ्यावी.सभेला येतांना ज्यात्या अधिकारी यांनी त्यांची जबाबदारीचा विचार करून सर्व लेखाजोखा घेवून उपस्थित रहाणे आवश्यक आहे.विकास कामाची आम्ही मागणी करतो तेंव्हा निधी नाही असे सांगण्यात येते.वार्ड अ ते फ मध्ये किती वसुली झाली. आस्थापना खर्च किती झाला जेवढा खर्च तेवढी वसुली तरी झाली का सर्व माहिती दयावी.

वार्ड अधिकारी-अ :वार्ड अ ची मालमत्ता कराची वसुली 3.45 ोटी नॉन ॲग्रीकल्चर ची वसुली 5.35 लक्ष, मागिल वर्षीच्या तुलनेत 58.66 लक्षची वाढ झाली 13 कोटीचे टारगेट आहे. एकुण पाच टिम वसुलीसाठी आहे प्रत्येकास डेली बेसीसवर वसुलीचे टारगेट दिले. स्पेशल टीम केली ते फक्त जप्ती बाबत कार्यवाही करते ज्यांचेकडे मोठी रक्कम 1 लक्षच्या वरील रक्कम थकीत असेल त्या बाबतीत कार्यवाही करते. वार्डात आस्थापनेवरील खर्च किती झाला याची माहिती मागवून घेवून देण्यात येईल.

मा.सभापती :वार्ड ब अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.त्रिंबक तुपे :सर्व वार्ड अधिकारी यांनी या बैंठकीला उपस्थित असावे असे मागिल बैठकीत ठरले होते असे असतांना वार्ड ब चे अधिकारी आजच्या बैठकीला उपस्थित नाही विभाग प्रमुख यांनी 3 वेळा फोन करून बोलावले वार्ड ब चे अधिकारी येत नाही.त्याचेवर कार्यवाही करणार अशी मनमानी करणे योग्य नाही.अति.आयुक्त बैठकीला आहे ते त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे.आम्ही सांगतो उत्पन्न वाढवा अधिका-यांना पाठीशी घालू नका वसुलीला कोणीही विरोध केला नाही. सभेला अधिकारी उपस्थिती बाबत पुढील बैठकीत उपस्थिती रजिस्टर ठेवावे.

श्री.अनिल जैस्वाल :जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येते त्यावर कुणाची सही असणे आवश्यक आहे.

श्री.त्रिंबक तुपे :वार्ड ब अधिकारी यांचे विभाग प्रमुख यांनी खुलासा करावा.

श्री.अनिल जैस्वाल :वार्ड ब चे अधिकारी स्थायी समितीच्या किती बैठकीला उपस्थित होते.वार्ड 19 मध्ये डेग्युच्या आजाराने नागरीकांचा मृत्यू होत आहे मजूर साफसफाई करीत नाही वार्ड ब चे अधिकारी वार्डात भेटी देत नाही. कार्यालयात बसत नाही. जन्म-मृत्यू

प्रमाणपत्रावर वार्ड अधिकारी यांचे ऐवजी लिपीक सही करून प्रमाणपत्र देत आहे. श्री.कांबळे नावाचे अपंग व्यक्ती आवक-जावक विभागात आहे सायंकाळी 7 ते 10 वाजेपर्यत थांबवून ठेवतात.अशा अधिका-यांना पाठीशी घालू नये त्यांचेवर आजच्या आज कार्यवाही करावी.

या वेळी स.सदस्य अनिल जैस्वाल हे मा.सभापती यांचे कडे प्रमाणपत्राची प्रत सादर करतात.

अति.आयुक्त :इतर महापालिकेत ही स्थायी समिती कामकाज होते.मी जेथे होतो तेथे दर शुक्रवारी बैठक होत असेल त्यात विभाग प्रमुख उपस्थित असायचे.येथील काय सुधारणा करायच्या त्या केल्या जातील.येथे स्थायी समितीला वार्ड अधिकारी उपस्थित असायला पाहिजे या बध्दल दुमत नाही.शेवटी सभागृह श्रेष्ठ आहे. जर सत्य परीस्थिती विचार घेतली पाहिजे. हरकत नाही सभागृहाचे सुचना असेल तर पुढील प्रत्येक बैठकीला विभाग प्रमुख व वार्ड अधिकारी उपस्थित राहतील.तशा सुचना त्यांना देण्यात येईल.वार्ड समितीच्या बैठका झाल्यास जे प्रश्न निर्माण होतील ते सोडण्यास मदत होईल.

श्री.त्रिंबक तुपे :सर्वसाधारण सभेत,स्थायी समितीत जो निर्णय होतो तो प्रशासनास बंधनकारक असतो.मागिल 2-3 बैठकीत कचरा, औषध फवारणी बाबत प्रश्न उपस्थित केले वार्ड अधिकारी खुलासा करण्यासाठी उपस्थित नव्हते त्यामूळे त्यांनी या समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्याचे मा.सभापती यांनी आदेशीत केले होते.त्यानुसार अधिकारी हजर असणे आवश्यक आहे.मीडीयांच्या माध्यमातून महापालिकेची वसुली व आर्थीक परीस्थित काय आहे हे आम्हाला कळते. वसुली हा महत्वाचा मुद्या होता अशा वेळी वार्ड अधिकारी असावे.विभाग प्रमुख फोन करतात तरी वार्ड ब अधिकारी येत नाही.अति.आयुक्त त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे.अति.आयुक्त आहे, 3 उपआयुक्त आहेत.वसुली वाढेल असे अपेक्षीत होते परंतु त्याउलट आपण मायनस मध्ये जात आहोत,पगार पुरते उत्पन्न येत असेल व विकास कामे होणार नसेल तर सभेला अर्थ नाही. वसुली करतांना आम्ही कधी कुणाला अडविले नाही.अधिकारी सभेला उपस्थित नाही.त्यांना पाठीशी घालू नये कुणाची मनोपल्ली नाही.अशा अधिका-यावर कार्यवाही व्हावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :काही महापालिकेत सभेला फक्त आयुक्तच हजर असतात तेच खुलासा देतात इतर अधिकारी नसतात. अति.आयुक्त उपस्थित आहे त्यांनी उत्पन्नाच्या बाबत खुलासा करावा.विभाग प्रमुख ऐकत नसतील तर आयुक्तानी कार्यवाही करीता पावले उचलावी.वार्ड कार्यालयात जेवढे कर्मचा-यांवर खर्च तेवढी वसुली होत नाही ही वस्तुस्थिती आहे.आता वार्ड अ 3.50 कोटी वसुली सांगितली परंतु तेथील कर्मचा-यावर 08 महिण्यात तेव्हढा खर्च झाला असेल.ज्याकडून कर येतो त्यांना सुविधा देणार की नाही,प्रशासनाने वसुली संदर्भात किती बैठका घेतल्या किती वसुली झाली.वसुलीकडे दुर्लक्ष केले अपेक्षीत उत्पन्न आले नाही किती रस्त्याची कामे चालू आहे कामाचा प्राधान्य क्रम केला जात नाही निविदा काढून सुध्दा काम सुरू होत नाही.नागरीकांना आम्हाला उत्त्तर दयावे लागते. उत्पन्नाच्या बाबतीत खुलासा घ्यावा.आताच स.सदस्य म्हटल्या प्रमाणे अधिकारी यांचे ऐवजी क्लार्क सही करून प्रमाणपत्र देत असेल तर अधिकारी यांनी त्यांचे अधिकार त्या कर्मचा-यांस दिले का दिले असेल तर मा.आयुक्तांची परवानगी घेतली का ? चौकशी करावी.

| | |
|---|---|
| श्री.अनिल जैस्वाल | :मृत्यू प्रमाणपत्रावर वार्ड अधिकारी यांचे सही ऐवजी क्लार्कच्या सहीने देणे नियमाने योग्य नाही खुलासा करावा. |
| अति.आयुक्त | :वसुली किती झाली,किती होणे अपेक्षीत होते मा.आयुक्तांनी विभाग प्रमुखाना बोलवून कोणत्या कशाच्या संदर्भात किती बैठका घेतल्या सर्व माहिती दिली जाईल.वसुलीच्या संदर्भात विभाग प्रमुख खुलासा करतील. |
| श्री.अनिल जैस्वाल | :मृत्यू प्रमाणपत्र जुने असेल तर मुख्य कार्यालयात यावे लागते परंतु हे नवीन प्रकरण आहे.वार्ड कार्यालयात मृत्यूप्रमाणपत्र हे क्लार्कच्या सहीने दिले आहे.ते योग्य आहे का ? |
| अति.आयुक्त | : आताच स.सदस्यांनी कागदपत्रे दिली त्याची रितसर तपासणी करून माहिती सादर केली जाईल. |
| श्री.संजय चौधरी | :मृत्यू प्रमाणपत्र देतांना चुक असेल तर संबधीतावर कार्यवाही करावी चौकशी व्हावी.जर क्लार्क अधिकारी दिले असेल तर ती चौकशी करावी अहवाल सादर करावा. |
| अति.आयुक्त | :आताच कागदपत्र दिली आहे.चौकशी केली जाईल. |
| श्री.त्रिंबक तुपे | :वार्ड ब चे अधिकारी यांना येंथे बोलवा अधिकारी दबाव टाकून काम करून घेत असेल तर योग्य नाही. |
| श्री.संजय चौधरी | :क.लिपीक कर्मचारी यांनाही बोलवून घ्यावे.चौकशीसाठी बोलवावे. |
| अति.आयुक्त | :सही कुणाची आहे यांची छाननी केली जाईल कार्यवाही करण्यास नकार नाही. |
| श्री.त्रिंबक तुपे | :वार्ड ब चे अधिकारी वार्ड कार्यालयात हजर राहत नाही ते जर दुस-याकडे जबाबदारी टाकून कार्यालयात उपस्थित राहत नसेल तर योग्य नाही. |
| श्री.अनिल जैस्वाल | :अपंग कर्मचारी यांना क्लार्क चे आवक-जावक्चे काम दिले हे योग्य नाही त्यांचे जागेवर दुसरे कर्मचारी घेण्यात यावे. |
| मा.सभापती | :वार्ड ब अधिकारी संदर्भात विषय समोर आला.यापुर्वी जन्म-मृत्यू प्रमाणपत्रा संदर्भात प्रकार घडला होता.त्यामुळे आरोग्य वैद्य.अधिकारी यांचेकडील चार्ज काढून वार्ड अधिकारी यांना दिला.वार्ड कार्यालयात असा प्रकार घडत असले व वार्ड ब अधिकारी कार्यालयात येत नसतील तर त्यांचेकडील चार्ज मा.आयुक्त यांनी काढून घेवून दुसरे अधिकारी तेथे नेमावे. |
| श्री.संजय चौधरी | :चार्ज काढून दुस-याला देणे हा पर्याय नाही वार्ड ब अधिकारी यांना येथे बोलवावे ते वार्ड कार्यालयात हजर का नसतात. सभेला का येत नाही त्यांना बोलवण्यात यावे तोपर्यंत सभा तहकूब करावी. |
| श्री.मीर हिदायत अली | :आतापर्यंत 5 ठिकाणी त्यांची बदली केली.कितीदा बदली करणार आहे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :बदली हा पर्यांय नाही त्यांचेकडे जी जबाबदारी सोपवली ते काम करून घ्यावे.प्रशासनाने ठरवून दिलेले कायदे नियम आहे. |
| श्री.अनिल जैस्वाल | :वार्ड ब चे अधिकारी पदाचा चार्ज दुस-या अधिका-याकडे द्यावा.वार्ड ब मध्ये जास्त वसुली होते. |
| श्री.मीर हिदायत अली | :अधिकारी काम करीत नसेल तर प्रशासन सक्षम नाही का?त्यांना जे काम दिले ते त्यांचेकडूनच करून घ्यावे.बदली करणे हा पर्याय नाही.प्रश्न तर सोडवावेच लागणार आहे. |
| श्री.जगदीश सिध्द | :या प्रकरणात तीन दिवसात चौकशी करून योग्य निर्णय घ्यावा. |

मा.सभापती :आताच स.सदस्यांनी जन्म-मृत्यू प्रमाणपत्रा संदर्भात प्रश्न माडला त्या संबधीची कागदपत्र अति.आयुक्ता यांचेकडे दिली आहे त्यांनी या संदर्भात 03 दिवसात चौकश्ी करून योग्य निर्णय घेवून माहिती दयावी.

श्री.जहागींर खान :माझ्या वार्डात अतिक्रमण झाले यापुर्वीच्या बैठकीतही मी सुचना मांडली होती.कटकटगेट ते पोलीस मेस पर्यंतचे अतिक्रमण काढत नाही अधिकारी सुट्टीवर जातात त्यांचा पगार चालू असतो.स्वच्छता निरीक्षक तसेच मजूर साफसफाई साठी नाहीतकुणी मालमत्ता कर ,पाणीपट्टी भरणा केली नाही तर 10 कर्मचारी येऊन नळ तोडतात. वार्डात साफसफाई होत नाही. वार्ड अधिकारी यांना कळविले तर एक दुस-याचे नाव सांगतात.स्वच्छता निरीक्षक कर्मचारी वार्डात येत नाही.पोलीस मेस ते कटकट गेट रस्त्यावर हातगाडया, हॉटेल उभारले.कर्मचारी येतात भेटतात सर्व मिळालेले असतात अतिक्रमण काढत नाही.रस्त्यावर पाईपलाईन टाकली खोदून ठेवले.पावसाचे पाणी रस्त्यावरून जाते पॅचवर्क खराब झाले.

श्री.काशिनाथ कोकाटे :स.सदस्यांचा जो विषय आहे त्याचा खुलासा होईलच.आठ महिण्यात किती उत्पन्न आले त्यातील पगारावर व विकास कामावर किती खर्च झाले.

कर निर्धा.व संकलक :मालमत्ता कर वसुली बाबत मा.आयुक्तांनी 4-5 वेळा बैठका घेतल्या. वार्ड वाईज प्रत्येक आठवडयात एक बैठक घेतली.गेल्या आठवडयात बैठक झाली प्रत्येक वार्ड कार्यालयात वसुलीसाठी 6 व जास्तीत जास्त 10 टीम केलेल्या आहेत. एकूण 130 कोटीचे टारगेट वार्डसाठी दिले.वार्ड अ चे 13 कोटीतून 4.06 कोटी ,वार्ड ब चे 28 कोटीतून 7.37 कोटी वार्ड क चे 11 कोटीतून 1.99 कोटी वार्ड ड चे 26.89 कोटीतून 7.09 कोटी वार्ड ई चे 20.02 कोटीतून 4.75 वार्ड फ चे 30 कोटीतून 9.56 असे एकूण 35.41 कोटी मालमत्ता कर व पाणीपट्टीतून वसुल झालेले आहे.आता पाणीपट्टी औरंगाबाद युनीलिटी कंपनी वसुल करते.मालमत्ता करा पोटी 29.95 ोटी वसुल झाले पाणीपट्टीची चार महिण्याची वसुली 5.46 कोटी वसुल झाले एकूण 23 टक्के वसुली झाली.कमर्शियल प्रॉपटीजकडे वसुलीसाठी लक्ष दिले जात आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :एप्रिल 14 पासून नोव्हेंबर पर्यतचा कर्मचारी पगार व प्रशासनाचा झालेला खर्च किती? याची माहिती पुढील बैठकीत द्यावी.130 कोटीतून फक्त 29 कोटी वसुल होत असेल तर योग्य नाही 100 कोटी वसुली होणार का? होर्डीग्जचे उत्पन्न किती उत्तर मिळत नाही.वार्ड वाईज वसुलीचे उद्दिष्ट कीती होते किती वसुली झाली व आस्थापना खर्च किती,आवक किती व जावक किती झाली याची सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.सिडको हस्तांतरण केले तेथील 29-30 गार्डन होते. तेथे जशी ठेकेदारी पध्दत होती त्याप्रमाणे महापालिका चालवीत होते.तेथील कार्यरत कर्मचारी यांना 1 वर्षापासून पगार नाही.तेथील काम कुणी केले.तसेच विकास कामाची क्रमवारी कशी आहे कुठे काम सुरू आहे याची माहिती द्यावी.

कर निर्धा.व संकलक :कमर्शियल 14-15 हजार मालमत्ता आहे त्यातून 4-5 हजार मालमत्ताचा टॅक्स 25-30 कोटी वसुल केले आहे.मध्यतंरी नोटीस देणे चालू होते दिपावलीमुळे मोहिम थांबविली होती.आता एक आठवडयात वसुली मोहिम चालू होईल.

श्री.त्रिंबक तुपे :वसुली का होत नाही ते नागरीक कर भरण्यास तयार नाही का तर न्यायालयात व इतर किती वादग्रस्त प्रकरणे आहेत त्या सर्वांना बोलवून विचारविनिमय करून तडजोड करावी.

कर निर्धा.व संकलक :सर्वांना पत्र देवून कळविले की आपली जी तक्रार असेल ती वार्ड अधिकारी यांचेकडे दयावी.कमी जास्त कर लागला असेल तर मार्ग काढता येईल.

श्री.त्रिंबक तुपे :ज्यांना कर भरण्याची इच्छा नाही असे लोक वकीलांना हाताशी धरून प्रकरण न्यायप्रविष्ठ करतात अशा लोकांना बोलवून त्यांचे चर्चा केली का?वार्ड अधिकारी यांचे बैठका घेतल्या त्यात ही प्रकरणे घेतली का?किती रक्कम या लोकांकडे थकीत आहे.

कर निर्धारक व संकलक : 5 कोटी पर्यत रक्कम असेल.

श्री.त्रिंबक तुपे :अशा सर्व नागरीकांना चर्चेसाठी बोलावे.योग्य मार्ग काढून जास्तीत जास्त वसुली होईल यासाठी प्रयत्न करावे.

श्री.जहागींर खान :कटकटगेट आझाद चौक पोलीस मेस रस्त्यावर मोठी अतिक्रमणे झालेली आहे. या रस्त्यावर 11 वर्षाचा मुलाचा हात फॅक्चर झाला इतर ही अपघात झाले यास जबाबदार कोण? पाईपलाईनवर टप-या टाकल्या आहेत.

प्रशासकीय अधिकारी :पोलीस मेस जवळील अतिक्रमण काढण्या संदर्भात प्रोसेस पुर्ण झाली नाही परंतु आझादचौकामध्ये अतिक्रमण काढण्याची 02 वेळेस कार्यवाही केली आहे.उर्वरीत कार्यवाही आठ दिवसाच्या आत होईल.

श्री.जहागींर खान :साफसफाईसाठी मजूर कर्मचारी नाही. स्वच्छता निरीक्षक एकच आहे तीनची आवश्यकता आहे. जे आहे तेही सुट्टीवर जातात.

श्री.मीर हिदायत अली :मोबाईल टॉवर, महापालिकेच्या मालमत्ता कर तसेच शासकीय अनुदान मिळून किती उत्पन्न प्राप्त आहे.

कर निर्धा.व संकलक :मोबाईल टॉवरच्या माध्यमातून 5.75 कोटी उत्पन्न मिळाले आणखी 6 कोटी येणे आहे संबधीत कंपनी मा.न्यायालयात गेलेली आहेत.मा.न्यायालयाने 50 टक्केच रक्कम वसुली करण्याचे आदेशीत केलेले आहे.हे प्रकरण कोणत्या स्टेजवर आहे विधी विभागाकडून योग्य मिळाले तर उर्वरीत रक्कम वसुली केली जाईल.

उपआयुक्त (मालमत्ता) :होर्डिंग्ज बाबत सन 2014-15 च्या अर्थसंकल्पात 4 कोटीचे उद्दिष्ठ दिले आहे.शहरामध्ये एकूण 348 परवानगी असलेल्या होर्डिंग्ज आहेत मागिल वर्षी 80 लक्ष उत्पन्न आले .सन 14-15 मध्ये 1.56 कोटी वसुल झाले. परवानाधारक होर्डिंग्ज यांना रू 53.58 प्र.चौ.क्वे.मी इतके दर आकारले आहे.हे 2009 पासून आहे.यात वाढ अपेक्षीत धरून तत्कालीन आयुक्त यांनी 75 रू प्रति.क्वेअर मी. हा दर ठरवून देण्यात आला होता.तसे त्या एजन्सीला कळविले त्यावर त्यांनी अक्षेप नोंदविला आहे.त्याचे समवेत एक बैठक सुध्दा घेतली त्यांचे म्हणणे असे की 20-25 टक्के वाढ करावी सर्व रक्कम भरण्यास तयार आहोत शिवाय पुढील तीन वर्षाचे अगाऊ रक्कम सुध्दा भरण्यास तयार आहे.

श्री.त्रिंबक तुपे :अधिकृत होर्डीग्जचा खुलासा झाला,अनधिकृत किती आहे? सर्वसाधारण सभेत होर्डीग्जच्या विषयावर चर्चा झाली व एकत्रित टेंडर काढले तर पुणे, मुंबईच्या धरतीवर या महापालिकेला यातून किमान 8-10 कोटी येतील असे म्हटले होते. 4 कोटीचे उद्दिष्ठामध्ये 1.56 कोटी वसूली ही अल्प आहे. होर्डीग्ज पासून येणारे उत्पन्न आपल्या हक्काचे आहे रेट वाढले तर एजन्सीसुध्दा जाहिरातीवर दर वाढेल एजन्सी धारक काय करतील यापेक्षा महापालिकेने काय करायला पाहिजे या बाबत विचार व्हावा.दर वाढवावे महापालिकेचे उत्पन्न बुडवू नये.अनेक प्रकरण वादग्रस्त

आहेत त्या बाबत काय कार्यवाही केली ते उत्पन्न मिळाले की नाही.या सभागहात अनेक प्रश्न होर्डींग्जच्या संदर्भात मांडले होते त्या संबधीचा डाटा मागवून घ्यावा.रस्ता दुभाजकावर छोटया ॲड करण्यासाठी दिले होते त्याचाही विचार व्हावा.दुभाजक चौक असेल यांचे सौदंर्यीकरण करून येथेही ॲड साठी दयावे.8-10 कोटी उत्पन्न आले पाहिजे असे नियोजन करावे.

उपआयुक्त(मालमत्ता) :सभागृहाच्या सुचनेनुसार वरिष्ठ अधिकारी यांचेशी चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.मीर हिदायत अली :जाहीरातीचे 9 वर्षापासून रेट वाढवले नाही दरवर्षी 5-10 टक्के रेट वाढविले पाहिजे आता एकदम वाढविले तरी ॲड देणारी एजन्सीने ते रेट प्रमाणे भरणा करावे.

श्री.त्रिंबक तुपे :अनधिकृत होर्डिंग्ज किती आहे. त्यांचेवर काय कार्यवाही करणार रेग्यूलाईज करणार काय ?

श्री.काशिनाथ कोकाटे :348 लिगल आहेत त्या व्यतिरिक्त इलिगल किती आहे ते शोधण्यासाठी पथक नेमावे त्या पथकास वाहने, पोलीस कुमक द्यावे.पुढील बैठकीपर्यंत अनधिकृत होर्डीग्ज काढावे ज्यांना रेग्युलर करता येत असेल त्यांचेकडून दंड वसुल करावे रेग्यूलर करावे हे सर्व अधिकार प्रशासकीय अधिकारी यांना दयावे जेणे करून उत्पन्न वाढेल जी वादग्रस्त प्रकरणे असतील तर त्यांचेशी चर्चा करून योग्य निर्णय घ्यावा जे ऐकत नसतील त्यांचेवर पोलीसात गुन्हे दाखल करावे.

श्री.त्रिंबक तुपे :ज्यांना परवानगी दिली त्यांवर परवाना नंबर असावा.अनधिकृत किती लगेच समजेल.जेवढया साईजची परवानगी घेतली तेवढयाच साईजचे होर्डीग्ज लावलेले असावे नसता त्यांचेकडून एक्ट्रा चार्ज आकारावे.

श्री.जहागींर खान :कटकटगेट समोर 30x30 चे होर्डीग्ज इमारतीवर लावलेले आहे परवानगी घेतली किंवा कसे ?

श्री.अनिल जैस्वाल :या बाबत पुढील बैठकीपर्यत कार्यवाही करावी तसे आदेशीत करावे त्यानंतरच्या बैठकीपर्यत जेथे अनधिकृत असेल याचा अर्थ माहिती खोटी दिली त्या अधिका-यावर कार्यवाही करावी.

श्री.मीर हिदायत अली :महापालिकेच्या मालमत्ता भाडेने दिल्या 200-400 रू. ते भरतात लाखो रूपये ते कमवीत आहे. त्यांना कर्मशियल टॅक्स लावण्यात यावा अशा किती मालमत्ता आहे सर्व यादी पुढील बैठकीत दयावी.तसेच आसाराम बापू यांचे आश्रमासाठी 6 एकर जमिन दिली तेथे कर्मशियल वापर होतो तेथे औषधी तयार होते.एक वर्ष झाले आजपर्यत टॅक्स लावला नाही.यापुर्वी 3.50 लक्ष टॅक्स लावण्यात आला असे म्हटले होते वसुल केले का ?

उपआयुक्त(मालमत्ता) :ही वसुली प्रभावीपणे होण्यासाठी खाजगी अभिकर्ता नियुक्तीसाठी टेंडर मागविले होते.दोन वेळेस टेंडर मागवले प्रतिसाद मिळाला नाही तिस-यांदा टेंडर काढले तेंव्हा संबधीत एजन्सीधारक यांनी स्टे आणला.

मा.सभापती :मा.न्यायालयात काय परीस्थिती आहे.

उपआयुक्त (मालमत्ता) :विधी सल्लागार या विषयी खुलासा देतिल.

मा.सभापती :या बाबतीत टेंडर आलेले आहे मा.न्यायालया समोर परवानगी मागितली असेल अर्ज केला असेल.एजन्सी स्टे आणु शकतात जेंव्हा अनधिकृत होर्डींग्ज लावतात त्यावेळी महापालिका कार्यवाही का करीत नाही.

उपआयुक्त(मालमत्ता) :तत्कालीन आयुक्त यांनी 13 मार्च 2013 ला प्रत्येक वार्डातील इमारत निरीक्षकास ही जबाबदारी सोपवून दिली.की 348 अधिकृत होर्डिंग्ज वगळता उर्वरीत होर्डीग्ज बाबत कार्यवाही करावी त्याचा अहवाल दर शनिवारी देवून कार्यवाही करावी व त्यांना आवश्यक ते वाहन देण्यात यावे असे संबधीत विभागास ही कळविलेले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :ज्या एजन्सीने स्टे आणला,स्टे उठविण्यासाठी काय प्रयत्न केले महापालिका कोणत्या स्टेजला आहे. उपआयुक्त यांनी टीम तयार करावे अनधिकृत असेल तर ते काढावे.

उपआयुक्त(मालमत्ता) :माहिती घेवून देण्यात येईल.

मा.सभापती :अनधिकृत होर्डिग्ज काढण्यासाठी संबधीत अधिकारी यांनी पथके नेमून उदयापासून कार्यवाही करावी यासाठी कर्मचारी उपलब्ध करून दयावा नंबर नसलेल्या होर्डीग्ज बाबत कार्यवाही काय केली स्थायी समितीकडे अहवाल सादर करावा.

श्री.त्रिंबक तुपे :195 कोटी उत्पन्न मनपास प्राप्त झाले असे म्हटले. त्यात रिलायन्स कंपनीची रक्कम समाविष्ट आहेत का?

मुख्यलेखाधिकारी :रिलायन्स कंपनीने जे खोदकाम केले त्यासाठी सन 13-14 मध्ये 26.06 कोटी तर सन 14-15 मध्ये 12.37 कोटी प्राप्त झाले.

श्री.काशिनाथ कोकाटे :ही रक्कम येण्यासाठी महापालिकेची यंत्रणा लावलेली नव्हती कंपनीशी करार केला त्यानुसार ही रक्कम आली सभागृहाची दिशाभूल होवू नये.195 कोटीतून ही रक्कम वजा केल्या 170 कोटीच वसुल झाले यात प्रशासनाचा खर्च किती झाला व विकास कामे किती झाली.

मुख्यलेखाधिकारी :195 कोटीमध्ये रिलायन्सने दिलेली 12.37 कोटीच रक्कमेचा समावेश आहे.

श्री.त्रिंबक तुपे :रिलायन्सने केलेले खड्डे बुजविण्यासाठी ही रक्कम दिली होती ते खर्च केले व तीच रक्कम उत्पन्नात धरत असेल तर दिशाभूल केल्याचे वाटते.

श्री.काशिनाथ कोकाटे :शासनाकडून 30 कोटी निधी येणार आहे परंतु त्यासाठी पत्रव्यवहार प्रशासन करीत नाही दलीत वस्ती सुधारणा योजनेचे अनुदान आणणार होते 10-15 वसाहतीमध्ये कामे झाली असती.

श्री.त्रिंबक तुपे :रिलायन्सने केलेले खड्डे बुजविण्यासाठी जी रक्कम दिली त्या कामासाठी वापरले का? किंवा इतर कामासाठी वापरली ?

श्री.मीर हिदायत अली :नागरीक पैसे जमा करून खड्डे बुजवत आहे.रिलायन्स कपंनीने दिलेली रक्कम कुठे खर्च केली.

मा.सभापती :रिलायन्स व इतर कंपनीने 40 कोटी दिले त्यातून त्यांनी खोदलेल्या रस्त्याचे काम करण्यासाठी काय नियोजन केले.

शहर अभियंता :रिलायन्स किंवा टाटा, आयडीया या कंपनीने 4 जी चे केंबल टाकण्यासाठी खोदकामाची परवानगी घेतली होती परवानगी घेतली त्यापोटी गेल्या वर्षीच्या शेवटी व या वर्षाच्या सुरूवातीला असे सहा महिण्यात साधारणपणे 40 कोटी रूपये मनपास भरणा केले.तसेच इलेक्ट्रीसिटी डयुटीपोटी शासनाला 29.85 कोटीचा जादा भरणा केला होता.म्हणजे बिलामध्ये त्यांनी ॲड करून दयायचे ते भरणे भाग होते.विद्युत नियामक जो कायदा आहे व त्यांचे जे मॅन्युवल आहे त्याचा अभ्यास करून त्यामध्ये असे होते की अर्बन लोकल बॉडीला विद्युत शुल्क लागूच

नाही.शासनाच्या ही बाब निदर्शनास आणून दिली ती शासनाने मान्य केली. रू.29.85 कोटी ही रक्कम विद्युत विभागाने त्याचा बीलाचा परतांवातून 8-10 महिण्यात ॲडजेस करून दिले. ही रक्कम समांतर जलवाहिनीसाठी जी एआेएसजी द्यायचे आहे त्यासाठी बाजूला ठेवले होते.या व्यतिरिक्त बजेट नसल्याने व शहरातील खड्डयाच्या संदर्भात मोठी ओरड सुरू झाली.त्यामुळे व्हा. टॅपिंगचे काम हाती घेतले होते. 40 कोटीच्या भरवश्यावर काम सुरू केले हे पैसे या कामासाठी वापरावे असे ठरले.व तसा पत्र व्यवहार सुध्दा या विभागाकडून झाला होता.व्हाइट टॅपिंगचे रस्त्याचे टेंडर काढले होते ते पैसे देण्यास आता अडचणी येत आहे.शिवाय टाईम लिमिट संपलेला आहे नोंव्हेबर 14 पर्यंत ते रस्त्याची कामे करायची होती.आता मुदतवाढ दयावी लागेल.

श्री.त्रिंबक तुपे :रिलायन्स व इतर तीन कंपनीने ज्या कामासाठी पैसे दिले ते दुस-या कामासाठी वापरले याचा अर्थ आर्थीक अडचण म्हणजेच वसुली झाली नव्हती.त्यातून पगार व ठेकेदारांना पेमेन्ट केले.पुर्ण शहरात 180 ठिकाणी रस्त्यामध्ये या कंपनीने खोदाई केली.वसुली करण्यामध्ये निष्काळजी करायची शहर बकाल करायचे हे योग्य नाही. आता खड्डे बुजवण्याकरीता काय कार्यवाही करणार आहे.नागरीकांना याचा त्रास होत आहे 40 कोटी हे शहरातील खड्डे व रस्त्यावर खर्च करायला पाहिजे होता.आता खड्डे बुजविण्यासाठी निधी उपलब्ध करावा 4 महिण्यानी निवडणुका आहे.जनतेला आम्ही उत्तर देवू शकत नाही.आठ दिवसात खड्डे बुजवावेत असे आदेशीत करावे.

श्रीमती प्रिती तोतला :शहरातील खड्डे बाबत दररोज बातम्या येतात.गरोदर महीलाना यामूळे त्रास होतो अनेक महिलांचे अपघात होत आहे.माझ्या वार्डातील रवि बलदवा यांना गाडी वरून पडल्याने 7 टाके पडले.संजय काकरिया नावाचे गृहस्त त्यांची पत्नीचा अपघात होवून मेंदूला मार लागला.तातडीने पॅचवर्क कसे करता येईल याचा प्रशासनाने विचार करावा व खड्डे तात्काळ बुजवावेत.

श्रीमती सत्यभामा शिंदे :डी बी. स्टारला खड्डे विषयी बातमी आहे. गरोदर महिलांना त्रास होतो स्त्री शिवाय हे जग निर्माण झालेले नाही.स्त्रीच्या अंगी सहनसिल व कर्तव्यसिल आहे.अनेक ठिकाणी खड्डे वाचविण्यासाठी बाजूला गाडी घेतल्यास अपघात होत आहे.रस्तेतील खड्डे न बुजवणे यास कोण दोषी आहे.अनेक नागरीकांना पाठीच, कमरेचा त्रास होतो अनेक जन बेडरेस घेत आहे.माझ्या वार्डात मोठे खड्डे झाले पॅचवर्कही झाले नाही.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:दोन वर्षापासून रस्ते खराब आहे.रस्ते खड्डयात आहे असे म्हणावे लागते. औरंगाबाद ऐतिहासिक शहर आहे लडंन अमेरिका व इतर देशातील पर्यटक येतात रस्त्यानेच जातात रस्ते चांगले असावेत.त्यानुसार शहराचा विकास होतो.डी.बी स्टार मध्ये खड्डे संदर्भात दररोज बातम्या येतात हा विषय प्रशासनाने सिरीयस घ्यावा.आताच स.सदस्या यांनी म्हटल्या प्रमाणे या खड्डयामुळे स्त्रियांना त्रास आहेतच परंतु अनेक पुरूषांना पाठीचा कमरेचा आजार वाढले. अपघात होत आहे.शासन हे नागरीकाच्या भल्यासाठी असते. येथे पुरूष प्रधान संस्कृती दिसून येते. जे करतात ते पुरूषासाठीच होते असे वाटते.अधिकारी त्यांचे फायदयाचे काम बरोबर करून घेतात. शहराच्या विकासासाठी प्रशासन पुढे येत नाही.मीडीयाद्वारे बातम्या येतात.इमानदारीने काम मिडीया जसे करते तसे प्रशासनाने इमानदारीने काम केल्यास ही परीस्थिती निर्माण होणार नाही.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :शहरात अनेक ठिकाणी खड्डे दिसून येतात.नातेवाईक मित्र कंपनी आम्हाला नावे ठेवतात.श्री.सोनवणे यांचे भाजीचा खड्डयामुळे गर्भपात झाला. हे सर्व खड्डयामुळे होत आहे. असे असतांना प्रशासनाला जाग का येत नाही. कंपनीने सुपरव्हिजन चार्जेस भरणा केले तर हे काम का होत नाही.श्री.बलदवा नावाचे व्यक्तीचा खड्डयामुळे हात फॅक्चर झाला.किती तासात हे काम होईल आश्वासन दयावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :रिलायन्स व इतर कंपनीकडून आलेले 40 कोटी कुणाच्या अधिकारात इतर कामावर खर्च केले.रक्कम कुणाला दिली किती टक्केवारी घेतली.

श्री.मीर हिदायत अली :स.सदस्यांनी जे मत मांडले योग्य आहे.खड्डयाचे शहर म्हणून आता ओळख होते.यात प्रशासन कुठे कमी पडते.प्रशासन नेहमीच दिशाभूल करीत आहे.दोन महिण्यात विकास कामे करण्याचे आदेशीत करावे. सभापती यांनी त्यांचे अधिकार वापरावे.रोषणगेट ते आझादचौक राममंदीर रस्त्याचे काम 3 वर्ष झाले होत नाही.5 प्रॉपटीवर स्टे आहे ते सोडून बाकी रस्त्याचे काम करावे.टेक्नीकल विभाग सांगतात नगररचना विभागाने मार्कींग करून दयावी नगररचना विभाग मार्कींग करून देत नाही 3 वर्षापासून अशा प्रकारचे काम होत आहे त्यामुळे रस्त्याचे काम पुर्ण होत नाही.सभागृहात नेहमीच चुकीची माहिती देवून दिशाभूल होते हे बरोबर नाही.दोन दिवसात या रस्त्याचे काम सुरू करण्याचे आदेशीत करावे.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:याच रस्त्यावर धार्मीक स्थळ आहे सेन्सेटीव्ह इश्यू ते हटवून रस्ता केला इतर खाजगी मिळकतीवर कार्यवाही का होत नाही.3 वर्षापासून या रस्त्याचे काम सुरू आहे.रस्ता दुभाजकाचे काम थांबले मागासभाग म्हणून असे होते 80 फुटाचा रोड मोकळा आहे स्टे त्या मिळकतीच्या घराला आहे. किरायाने घर देत आहे व्यवसाय करतात. सन 1975 पासून पुर्ण होत नाही.प्र.आयुक्त येऊन 3-4 महिणे झाले त्यांनी त्यांचे कर्तव्य दाखवावे. आचारसंहितेचे निमित्त समोर करून काम होत नाही. वार्डातील कचरा उचलला जात नाही. येथे तुर्त पैशाची गरज नसतांना काम होत नाही.कर्मचारी यांचे जागेवर दुसरे लोक काम करतात.त्यांना आवश्यक साहित्य दिले जात नाही तेच कर्मचारी आजारी पडतात पुन्हा 3-4 लक्षचा खर्च होता एक रस्ता तयार करण्यासाठी 3-3 वर्ष लागणार असेल तर योग्य नाही.ऐतिहासिक शहर आहे लाजीरवाणी बाब आहे लहान काम 3 वर्ष लागले. यामूळे आम्हाला अंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागतो.

श्री.जहागींर खान :शहरात अनेक ठिकाणी खड्डे आढळून येतात. वार्ड अधिकारी लक्ष देत नाही सुट्टी घेतात मालमत्ता कर,पाणीपट्टी वसुली करण्याची प्रशासनाची जबाबदारी आहे. अतिक्रमण वाले येतात इमारत पाडतात त्यात मृत्यू होतो. जसे शहागंज भाजीमंडई मध्ये झाले होते.विकास कामे व्हावी अशी आमची भावना आहे. जनतेसमोर आपण सर्व बदनाम होत आहोत.याची दखल घेणे आवश्यक आहे.

श्री.जगदीश सिध्द :रिलायन्स कंपनीने रक्कम दिली सहा महिणे झाले त्यातून खड्डे बुजविण्याचे काम न करता ती रक्कम इतर कामासाठी कुणाच्या आदेशाने कुठे वापरण्यात आले.

मा.सभापती :रिलायन्स व इतर कंपनीने त्यांनी केलेले खड्डे बुजविण्याकरीता 40 कोटी जमा केले होते. ते इतर कामासाठी कुणाच्या आदेशाने खर्च केले.

मुख्यलेखाधिकारी :व्हाइटटॅपींग व डांबरीकरणाची 45 कोटीची कामे हाती घेतली त्या वेळेस मा.आयुक्तंनी बैठक घेऊन रिलायन्सकडून येणारी रक्कम ही बाजूला ठेवून ही कामे

प्राधान्याने करण्याचे ठरले. रिलायन्स कडून 2013-14 मध्ये 26.06 कोटी आले त्यातून 2013-14 मधील देखभाल दुरूस्ती पॅचवर्क मिळून 4.88 कोटी तसेच डांबरीकरणावर 13.85 ोटी खर्च केले.सन 2014-15 मध्ये देखभाल दुरूस्ती पॅचवर्कवर 1, डांबरीकरणावर 5 असे 6 कोटी खर्च केले.व्हाईट टॅपिंगची 10.53 कोटी बिले अदा केली.

श्री.काशिनाथ कोकाटे :रिलायन्सने दिलेली रक्कम मुळ जे काम करायचे त्यावर खर्च न करता आताच खुलासा केल्याप्रमाणे 23 कोटी रूपये रस्त्याच्या कामासाठी कुणाच्या आदेशाने खर्च केले असे असतांना पॅचवर्कचे काम झाले नाही कोणत्या एजन्सीला कोणत्या रस्त्याचे काम दिले कालावधी किती दिला. वार्डातील संचिकेवर चर्चा करावी असा शेरा येतो.ती चर्चा करण्यास वेळ नाही.हा 40 कोटी दुस-या कामासाठी दिले गेले याची चर्चा केंव्हा झाली त्याचे इतिवृत्त समोर आणावे.माझ्या माहिती प्रमाणे ही रक्कम नको तेथे खर्च केली.सढळपणे ठेकेदाराना वाटप केले.

श्री.त्रिंबक तुपे :03 कंपनीने दिलेली रक्कमेतून 23 कोटीची बिले जे रस्त्यापोटी दिली गेली ती रक्कम त्या कामासाठी बजेट मध्ये तरतूद नव्हती काय? डिफरमध्ये दिले का, कोणत्या कामाची बीले दिली त्याची यादीसह माहिती दयावी.

श्री.मीर हिदायत अली : 23 कोटी कोणत्या रस्त्यावर खर्च केले यादी दयावी.जकात नाकापासून पुढे जळगाव रस्त्यापर्यत सहा महिण्यापुर्वीच काम केले पुर्ण खराब झाला. संबधीतास बिल दिले का? रिलायन्सने दिलेल्या रक्कमेतून कोणत्या रस्त्याच्या कामाची बीले दिली. सर्व रस्त्याच्या यादीसह माहिती द्यावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :रस्त्याची कामे झाल्यानंतर टेक्नीकल ऑडीट करता येते का? जी कामे झाली त्याची लेव्हल बरोबर नाही.

श्री.संजय चौधरी :4-5 महिण्यापूर्वी पॅचवर्कचे टेंडर काढले. वार्ड इ साठी 52-55 लक्षचे टेंडर काढले होते.ठेकेदाराने पाहणी केली काही ठिकाणी काम केले असेल 4 महिणे झाले त्या ठेकेदाराचे काम दिसून येत नाही. अशी परीस्थिती असेल तर किती उत्पन्न आले तरी महापालिका आर्थीक संकटात दिसणार आहे.या बाबत खुलासा करावा.

श्रीमती सत्यभामा शिंदे :पॅचवर्कचे काम कुणास दिलेले होते.

कार्य.अभियंता(इ/फ) :वार्ड ई मध्ये अरोरा व बी अजींतसींग या दोन एजन्सीकडे काम दिले होते अरोरा यांनी गणपती विर्सजन मार्गावरील डब्ल्यु बीएम व जीएसबीचे पॅचवर्क केले.बी अजितसींग यांनी कोणतेही काम केले नाही.

श्री.संजय चौधरी :कुठे काम झाले माहिती द्यावी.अरोरा एजन्सीने कुठे काम केले.विसर्जन रूट आमच्या भागात आहे तेथे काम केले नाही.

श्री.त्रिंबक तुपे :ज्या ज्या वार्डात कामे करायची ती स.सदस्यांनी सांगीतले तेथे कामे केली नाही.

श्री.संजय चौधरी :ठेकेदारास बील दिले जाते. जालना रोड प्राव्हेट कंपनीने काम केले.तो रस्ता विसर्जन मार्ग येत नाही.

श्रीमती सत्यभामा शिंदे :वार्ड ई अंतर्गत कोणत्या रस्त्याचे काम केले.

कार्य.अभियंता-इ व फ :संजयनगर मुंकूदवाडीसाठी रामनगर येथे व चिकलठाणा येथे एक विहिर आहे.अशा तीन विहिरी आहे.एअरपोर्ट च्या मागे जो श्रीमती घडमोडे यांचे वार्डातून गणपती विर्सजनचा रूट आहे त्या रस्त्यावर डब्ल्यूबीएम व जीएसबीचे काम केले डांबरी पॅचवर्क केले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :यात अफरातफर आहे त्या एजन्सीला पेमेंन्ट दिले नाही.काम न होता सर्व प्रकारचे व्यवहार होत आहे. काम होत नाही.23 कोटी सहजासहजी खर्च झाले नाही यात कोणती कामे केली. हा जनतेच्या कष्टाचा पैसा आहे. या बाबतीत चौकशी करावी जर 23 कोटी इतर रस्त्यासाठी खर्च केले तर बजेटमध्ये त्यासाठी तरतूद नव्हती का.व्हा.टॅपिंग व डांबरीकरणाची एजन्सीला 23 कोटी दिले असेल तर त्यांनी कामे का बंद केली.

श्री.त्रिंबक तुपे :23 कोटीतून पॅचवर्क साठी पैसे खर्च केले का ?

श्री.मीर हिदायत अली :पॅचवर्क ऐवजी सरळ त्या रस्त्याचे काम करून घ्यावे परंतु ते न होता पॅचवर्क सुध्दा केले नाही.

श्री.त्रिंबक तुपे :पॅचवर्कसाठी यातून किती खर्च केले.काम झालेले दिसून येत नाही.40 कोटी खर्च कुठे व कुणाच्या अधिकाराने केले याची सविस्तर माहिती ठेवावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :23 कोटीतून ठेकेदाराची बीले दिली असेल तर काम काम बंद आहे.क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यासाठी शासनाचे अनुदान आहे तरी काम होत नाही तोच ठेकेदार दुसरे काम घेतो हे बरोबर नाही.बजरंग चौक ते बळीराम पाटील हायस्कूल डिफर पेमेंन्टवर रस्त्याचे काम दिले ते 3 वर्षापासून दिले काम होत नाही 23 कोटीतून कोणास पेमेंन्ट दिले कोणत्या रस्त्यासाठी दिले. सर्व वार्डात विकास कामे व्हावी अशी आमची मागणी आहे.

मा.सभापती :रिलायन्स व इतर टेलीकॉम कंपनीच्या माध्यमातून आलेले 40 कोटी रक्कमेतून केलेल्या खर्चाची रस्त्याच्या नावासह यादी सभागृहात द्यावी.जे ठेकेदार देयक अदाई नंतर पुढील काम करीत नसतील त्यांना ब्लॅक लिस्ट करण्याची कार्यवाही प्रस्तावित करणे.03 दिवसात माहिती सादर करावी.

श्री.मीर हिदायत अली :तत्कालीन सभापती यांनी पॅचवर्क संदर्भात समिती नेमली त्यात स.सदस्य श्री. जगदीश सिध्द शहर अभियता व मुख्य लेखा परीक्षक होते ती संचिका मिळत नाही.खेदाची बाब आहे.

मा.सभापती :तीन दिवसात यादी सादर करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :23 कोटीतून ज्यांना बील दिले त्या ठेकेदाकडे असलेले काम सुरू करण्याच्या सुचना द्याव्यात.

श्री.मीर हिदायत अली :हर्षनगर भागात पाणी येत नाही त्या भागातील महिला गेटसमोर उपोषणास बसलेल्या आहेत त्यांचा प्रश्न सोडवावा.

श्रीमती प्रिती तोतला :एप्रिल पासून ते आता नोंव्हेबर आहे 8 महिण्यापासून बारूदगर नाला भागात पाणी नाही.समांतर एजन्सीचे काहीच काम वार्डात होत नाही अंगुरीबाग येथे आमदार जैस्वाल साहेब यांचे निधीतून रस्त्याचे काम करायचे होते. याभागात 40 फुटाची लाईन टाकायची आहे.रस्ता फोडून लाईन टाकू असे म्हटले होते अजूनही ते काम झाले नाही. 8-9 महिने पाणीपुरवठा सुरळीत केला नाही यापेक्षा महापालिकेचे कर्मचारी चांगले काम करीत होते.किती दिवसात पाणी मिळेल.

श्री.त्रिंबक तुपे :पाणीपुरवठा करण्याचे काम संमातर एजन्सीचे होते. आतापर्यत 15 कोटी दिले असेल ज्या ज्या ठिकाणच्या लाईन टाकणे आवश्यक आहे अशी कामे करावी. जेथे पाणी एकत्र होते तेथील कामे करायला पाहिजे ती हाती घेतली नाही.200 कोटी एजन्सीला महापालिका देणार अशी बातमी आली.अशी कोणतीही रक्कम देवू नये.तो बोजा महापालिकेने घेवू नये.

श्रीमती फिरदोस फातेमा खानः कोणकोणती कामे समांतर एजन्सी करणार होते.जुन्या शहरात आजही पाणी येत नाही काम केले जात नाही.लाईट नाही दुरूस्ती चालू आहे अशी वेगवगळे कारण सांगितले जाते.हायड्रोलिक डिझाईन असतांना लाईन वारंवार का फुटत आहे.पाणीपुरवठयाची लहान मोठी कामे ही समांतर एजन्सीमुळे थांबलेली आहे का ती कामे का होत नाही.

श्री.संजय चौधरी :माझ्या वार्डात विमानतळ कॉलनीतील लाईनचे काम होते टेंडर झाले त्यानंतर आता समांतर एजन्सी करणार असे म्हटले जाते. दुषित पाणी येते.तीन महिण्यात ती एजन्सीने काम केले नाही.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : पाणी सोडण्याचे वेळ बदलला ,पाणी का आले नाही विचारणा केली तर लाईट नाही व इतर कारणे दाखवतात.

श्री.अनिल जैस्वाल :माझ्या वार्डात एक इसमाचे निधन झाले त्यांचेकडे पाण्याची गरज होती खालचे कर्मचारी चर्चा झाले त्यांनी संबधीत कर्मचारी यांना सांगितलेच नाही.पाण्याची गरज पडल्यास टॅकर मिळत नाही पाणी केंव्हा येणार याची माहिती होत नाही समांतर एजन्सीचे जे संबधीत अधिकारी आहे त्यांना बोलवून त्यांचेशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही करावी.

कार्य.अभियंता(पापू) :हर्षनगर भागात नवीन लाईनचे काम आहे.अशी कामे जेंव्हा हायड्रोलिक मॉडेल कंपनीकडून सादर होईल तेंव्हा ही कामे होतील.देखभाल दुरूस्तीची तक्रार असेल तसेच घाण पाणी येत असेल तर त्याची दखल तातडीने घेतो.तसेच स.स.श्री.चौधरी यांचे वार्डात लाईनचे काम करण्या बाबत कंपनीला सुचना केली जाईल.

वार्ड अभियंता ई :स.स.श्री.चौधरी यांचे वार्डात पाईप बदलायचे आहे हायड्रोलिक मॉडेल होत नाही तोपर्यंत काम करता येणार नाही.कपंनी तर्फे तो पाईप काढून तेथील अडचण दुर केली जाईल.

मा.सभापती :पाणी प्रश्ना संदर्भात संबधीत अधिकारी यांना दालनात बोलवून हा प्रश्न सोडविला जाईल.

श्री.जगदीश सिध्द :गांधी पुतळा ते पेट्रोल पंप व धावणी मोहल्ला येथील पाईप लाईन टाकली.दोन लाईनचे कनेक्शन जोडणे नाही.एक वर्षापासून थांबले संबधीत ठेकेदारास काम न होता बील कसे दिले.अंगुरीबाग येथेही लाईन टाकली जोडणी केली नाही.ठेकेदारास बील दिले गेले.अनेकदा बोललो काम होत नाही.

कार्य.अभियंता(पापू) :त्या भागात पाणी कमी येते त्यामुळे क्रॉस कनेक्शन केले नाही पाणी वाढले तर त्यावेळेस ही जोडणी करता येईल.

श्री.जगदीश सिध्द :2-3 दिवसात,आठ दिवसात जोडणी होईल असे सांगण्यात येते. अधिकारी खोटे बोलत आहे कार्यवाही करावी काम पुर्ण होताच संबधीतास बील का देण्यात आले.

शहर अभियंता :याबाबत संबधीत अधिकारी स.सदस्य व मी स्वत:पाहणी करून क्रॉस कनेक्शन लवकरात लवकर होण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :मागिल सात महिण्यात मालमत्ता कराची 25 टक्केच वसुली झाली.सन 2014-15 या आर्थीक वर्षाकरीता जे उद्दीष्ट ठरवुन देण्यात आलेले आहे त्या प्रमाणात वसुली अत्यंत कमी झालेली आहे अर्थसंकल्पातील वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण करण्यासाठी कठोर उपाययोजना व आजपासून नियोजन करून वसुली करण्याची गरज आहे.निवासी मालमत्ता कराच्या 10 हजार पर्यंतच्या थकबाकी वसुलीसाठी वॉर्ड

अधिकारी, निवासी व कमर्शियल मालमत्ता कराच्या 10 ते 50 हजार पर्यंतच्या थकबाकी वसुलीसाठी लेखाधिकारी, सहाय्यक आयुक्त,उपअभियंता याची वार्डनिहाय नेमणूक करणे व 50000ते 1.00 लाख पर्यंतच्या थकबाकी वसुलीसाठी सर्व कार्य.अभियंता, तसेच 1.00 लाखापेक्षा जास्त निवासी किंवा कमर्शियल थकीत मालमत्ता कर,मोठे व्यापारी प्रतिष्ठाण,शॉपींग मॉल, शिक्षण संस्था,ई.कडून कराच्या थकबाकी वसुलीसाठी सर्व उपआयुक्तांची वॉर्डनिहाय नेमणूक करणे.तसेच एक मजली इमारतीच्या जागी बहुमजली बांधकाम झाले मालमत्ता कर पुर्वी प्रमाणे सुरू आहे इमारतीच्या वापरात व आकारमानात बदल झला तर नव्याने मालमत्ता कर आकारणी करण्यासाठी मालमत्ता कराचे रिव्हीजन करणे आवश्यक आहे या संबधीचे नियोजन करून तसे आदेश मा.आयुक्त यांनी निर्गमित करावे.अतिरिक्त कर्मचारी देण्यात यावे.

अति.आयुक्त :आताच ज्या सुचना केल्या त्यानुसार कार्यवाही होईल.ऑलरेडी नळ कनेक्शनचे सर्वेचे काम एजन्सी करीत आहे.त्यांचेकडून माहिती घेवून जास्तीत जास्त वसुली करण्याबाबत उपाययोजना केल्या जातील.

श्रीमती प्रिती तोतला :डेग्युने शहरात डोके वर केले. राज्यात या शहराचा तिसरा क्रमांक लागतो साफसफाईचे मजूराकडून करून घेण्याची जाबाबदारी वार्ड अधिकारी यांची आहे.वार्ड अधिकारी फोन उचलत नाही.फॉगींग मशीन वार्डात नाही.जे औषध फवारणी होते ते निष्कृष्ठ दर्जाचे आहे मच्छर डास मरत नाही.दीड दोन वर्षापुर्वी कचरा उचलून नेत्यानंतर डेपोमध्ये गाडीचे वजन केले जात होते आता वजन काटा बंद केला त्यामूळे अनेक भागातील वरवरचा हलका कचरा उचलून नेत आहे.गुजराती शाळा,बारूदगर नाला, सुराणा बिल्डीग या भागातील कचरा पुर्णत: साफसफाई होत नाही.येथून लहान मुलाचे ये-जा जास्त असते.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:देशात स्वच्छता अभियान राबविले जात आहे असे असतांना वार्डात कचरयाची समस्या आहेत.आमचे वार्ड स्लम भागातही कचरा साचतो तो उचलावा.

श्री.त्रिंबक तुपे :शहरात अनेक भागात 20-25 मोकाट कुत्र्याचे टोळके फिरताना दिसतात.विचारणा केली असता मागिल एजन्सीला पेमेन्ट दिले नाही असे कळते.माहिती घ्यावी.

श्री.मीर हिदायत अली :आरोग्य विभागात फिक्स पेमेंन्टवर 9 डौंक्टर्स कार्यरत होते.तीन नोकरी सोडून केले.नर्स 49 होते 25 राहिले. 4-4 महिणे पेमेंन्ट होत नसल्याने ते नोकरी सोडून जात आहे. शहरात डेग्युंची साथ वाढत आहे. आरोग्य विभागातील कर्मचारयाची गरज आहे.

श्री.अनिल जैस्वाल :फवारणी करणारे एजन्सीला काम करण्याचा कालावधी कुठ पर्यत आहे.

श्री.मीर हिदायत अली :मलेरीयाचे गोडाऊन बाजूलाच आहे.चांगल्या प्रतिचे औषध नाही.फवारणी होत असलेले औषध चांगल्या प्रतीचे नाही त्यांचे पेमेन्ट थांबविण्याचे आदेशीत केले होते. तरीही बील देण्यात आले. डेग्युची साथ वाढतच आहे.फवारणीने काहीही फरक पडत नाही.गोडाऊनची तपासणी करावी.आरोग्य अधिकारी सभेला उपस्थित नसतात दुस-याकडे चार्ज देतात.रूग्णाची संख्या वाढत आहे उपाय होत नाही जे खुलासा करतील त्यांना दोषी ठरवून कार्यवाही करावी.

वैद्यकीय अधिकारी :गेल्या महिण्यापासून डेग्युचे राज्यभरात रूग्ण आहे येथील संख्या आता कमी झाली नाही.आतापर्यत संशयीत डेग्यूमूळे 8 मृत्यू झाले.पॉझीटीव 107 रूग्ण आहे.

| | |
|---|---|
| श्री.अनिल जैस्वाल | :डेंग्यु मूळे 19 लोक मृत्यू पावले पॉझीटिव्ह रिपोर्ट संख्या 492 आहे अधिकारी चुकीची माहिती देत आहे हे योग्य नाही.फॉगींग मशीन किती आहे बंद किती आहे. |
| वैद्यकीय अधिकारी | :एकूण हॅण्ड मशीन 42 आहे. |
| श्री.अनिल जैस्वाल | :एकूण 60 मशीन आहे.ज्यांना माहिती नाही ते खुलासा करतात कशासाठी चार्ज घेतात.ज्यांनी खुलासा करायचा ते मुंबईला गेले.नागरीकाच्या मृत्यूशी खेळत आहे.गांभीर्याने घेतले जात नाही.मलेरीया विभागाची आजच पाहणी करावी नसता मी डायस समोर धरणे करील.वार्ड ब व ई मध्ये दररोज किती औषधी साठा जमा करायला पाहिजे. |
| वैद्यकीय अधिकारी | :एक महिण्याला एजन्सीने अॅबेट 06,डेटामेथॉन 40,पॅरेथॉन 26, एमएलो 105, बीटीया लिक्वीड 80 लि. एवढे जमा करायला पाहिजे. |
| श्री.अनिल जैस्वाल | :आताच सांगीतल्यानुंसार एजन्सीने ही औषधी जमा केली का? |
| वैद्यकीय अधिकारी | :अॅबेट हे औषध मे सचिन पेस्ट कन्ट्रोलने 03 लि.,भारत पेस्ट कन्ट्रोलने 03 लि.अजिंठा पेस्ट कन्ट्रोलने जमा केले नाही,आर डी पेस्ट कन्ट्रोलने 03,गणेश पेस्ट कन्ट्रोलने 03 लि., डेटामेथॉन हे औषध मे.सचिन पेस्ट कन्ट्रोलने 20 लि.भारत कन्ट्रोलने 20 लि.आरडी कन्ट्रोलने 20 लि.,पॅरेथॅान हे औषध सचिव कन्ट्रोलने 26 लि.पैकी काहीच जमा केले नाही.आरडी कन्ट्रोलने 05 लि, भारत ,गणेश कन्ट्रोलने 10 लिटर असे जमा केले आहे. |
| श्री.अनिल जैस्वाल | :ठरवून दिलेली औषधी एजन्सी देत नाही. अशा एजन्सीला पाठीशी घालू नये त्यांचेवर कार्यवाही व्हावी. वार्डात कोणतेच काम होत नाही आणि ही एजन्सी काम न करता यांना बिल दिले जाते. एकूण किती एजन्सी काम करतात. |
| वैद्यकीय अधिकारी | :एकूण सहा एजन्सी काम करतात दोन एजन्सीला महापालिकेकडून औषधी दिली जाते. विक्टो बीटीया 102 पैकी 35 लि.जमा केले.अजिंठा पेस्ट कन्ट्रोलने 80 पैकी 32 लि,आर.डी पेस्ट कन्ट्रोलने 80 पैकी 35 लि.जमा केले. |
| श्री.अनिल जैस्वाल | :सध्या औषधी साठा किती आहे व किती दिवस त्यात फवारणी होईल. |
| वैद्यकीय अधिकारी | :_अॅबेट 39लि,डेटामेथॉन 80, हे औषध सचिन कन्ट्रोलने 20 भारत कन्ट्रोलने 20 लि.आरडी कन्ट्रोलने 20 लि.,पॅरेथॉन 35 लि.एमएलो ऑईल 205 लि.बीटीया लिक्वीड 102 लि.बिटीया पावडर 130 किलो आहे.ही औषधी साठा 15 दिवस हा साठा पुरेल. |
| श्री.अनिल जैस्वाल | :एक दिवस पुरेल एवढाच साठा आहे. चुकीची माहिती देत आहे.ठेकेदाराचा कालावधी किती आहे. |
| वैद्यकीय अधिकारी | :याची माहिती सध्या माझ्याकडे नाही. |
| श्रीमती सत्यभामा शिंदे | :दोन लोक सहा वार्डात फवारणी करतात त्यांना 6 वार्डासाठी 50,100 ग्रॅम औषधी दिली जाते हे योग्य नाही.2-2 महिणे फवारणी साठी येत नाही. |
| श्री.अनिल जैस्वाल | :पुढील बैठकीत सर्व अधिकारी हजर असावेत.जो प्रश्न उपस्थित होईल त्याचे उत्तर सभागृहात मिळावे तशा सुचना प्रशासनाला देण्यात याव्यात. |
| मा.सभापती | :या ठेकेदाराना काळया यादीत टाकावे यापुर्वी आदेशीत केले होते.डेंग्युचे प्रमाण वाढलेले आहे. ठेकेदार काम करीत नाही.यापुर्वी आलेले आहे टेंडर तातडीने उघडण्यात येवून जे ठेकेदार काम करतात त्यांच्या कामाची चौकशी झाल्याशिवाय त्यांना पेमेन्ट करू नये त्यांना काळया यादीत टाकावे.पुढील बैठकीत सर्व अधिकारी यांनी हजर रहावे. |

| | |
|---|---|
| श्री.अनिल जैस्वाल | :शहरात मोकाट कुत्र्याचा सुळसुळाट झाला त्यांची नसबंदी करावी. |
| मुख्य पशुसंवर्धन अधि. | :कुत्रे पकडण्याचे काम ऑऊट सोर्सीगवर दिले आहे अमरावती येथील संस्था आहे दोन महिण्यापासून काम बंद आहे 4-5 महिण्याचे बील त्यांना अदा केले नाही. त्याचे पथकात 10 कर्मचारी व दोन डॉग व्हॅन होते.आता महापालिकेकडून कुत्रे पकडण्याचे काम होते. |
| श्री.त्रिंबक तुपे | : 10 कुत्रेचे टोळके एकत्र दिसून येतात.दोन चार वाहने वाढवा कुत्रे पकडण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी. |
| श्री.जहागीर खान | :दोन महिण्यापासून पकडतो असे सांगतात.लहान पिल्ले दिसून येतात ते कसे आले. दोन महिण्यात पिल्लू होते का ? |
| मुख्य पशसंवर्धन अधि. | : प्रत्येक वार्डाच्या ठिकाणीच गाडी व पथक ठेवायचे असे ठरले यासाठी चार वाहने व 20 कर्मचारी यासाठी या विभागास देण्याचा निर्णय झाला.यास सहा महिणे झाले यांत्रिकी विभाग व आस्थापना विभागाची मदत झाली तर हे काम करता येईल. |
| श्री.सुरेंद्र कुलकर्णी | :6 महिण्यापासून कार्यवाही चालू आहे असे सांगण्यात येते. नियोजन करून काम सुरू करावे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :दोन दिवसापूर्वी जवाहन कॉलनीमध्ये शाळकरी मुलास कुत्र्याने चावा घेतला 7-8 वार्डाची मागणी असते. या बाबत प्लॅनींग करावे 10-15 दिवसाच्या आत सुरू करावे. भाडयाने वाहने घ्यावी. |
| उपअभियंता(यां) | :संबधीत विभागास दुपारपाळीमध्ये वाहन दिले जातील.जाळी बंद करण्यास वेळ लागेल. |
| मा.सभापती | :यासाठी भाडयाने वाहने घ्यावीत. नवीन वाहने येईल पर्यत भाडयाने वाहने लावावी. जुन्या एजन्सीला पेमेन्ट करावे. |
| श्री.मीर हिदायत अली | :नसबंदी कोण करते.त्यानंतर सोडून देण्यात येते का? |
| मा.सभापती | :मोकाट कुत्रे पकडण्याची कार्यवाही तातडीने करावी. |
| श्रीमती प्रिती तोतला | :कचरा गाडीचा काटा वजन करण्यात यावे तसे आदेशीत करावे. |
| श्री.जगदीश सिध्द | : 1124 कर्मचारी भरतीतील परीविक्षाधीन कालावधी खुला करून सेवा पट देणार होते दोन पथक तयार करून आठ दिवसाच्या आत कार्यवाही करावी असे आदेश मा.आयुक्त यांनी दिं. 4-1-14 रोजी काढले होते की 262 कर्मचारी यांना सेवा पट दिले त्यांचा परिविक्षाधिन कालावधी खुला करावा असे स्पष्ट म्हटले होते.उर्वरीत कर्मचारी यांची कागदपत्र तपासणी करून परीविक्षाधिन कालावधी खुला करावा. 11 महिणे झाले कार्यवाही होत नाही त्यातील दोन कर्मचारी मृत्यू पावले. 262 कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी 3 दिवसात खुलासा करावा उर्वरीत कर्मचाऱ्याचे कागदपत्र तपासून 15 दिवसाच्या आत निर्णय घ्यावा. |
| श्री.मीर हिदायत अली | :10-15 वर्षापून कर्मचारी काम करतात त्यातील दोन कर्मचारी मृत्यू झाले 262 कर्मचा-यांची यादी तयार आहे तीन दिवसाच्या आत ही कार्यवाही करावी. |
| मा.सभापती | : 262 कर्मचारी यांना सेवापट दिले आहे त्यांचा परीविक्षाधीन कालावधी 3 दिवसात खुला करावा तसेच उर्वरीत कर्मचारी यांचे सर्व कागदपत्र 15 दिवसात तपासणी करून त्यांना सेवापट व परिविक्षाधीन कालावधी खुला करण्या संदर्भात कार्यवाही व्हावी. |

श्री.जहागींर खान :सदफ कॉलनीतील ले-आऊट खुल्या जागेत वाळू खडी टाकून अतिक्रमण होत आहे.तसेच वार्डात साफसफाईसाठी मजूर नाही स्वच्छता निरीक्षक हजर राहत नाही.

मा.सभापती :सदर ठिक्‍ाणी प्रशासकीय अधिकारी यांनी खुल्या जागे संबधी तातडीने कार्यवाही करावी व तसा अहवाल सादर करावा स.सदस्य श्री.जहागींर खान यांनाही कार्यवाही केल्या बाबत कळवावे.

**विषय क्र. 78 :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकुण 148 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जातात. सर्व बालवाडी वर्गाचे एकुण 3,360 विद्यार्थी आहेत, हे विद्यार्थी साधारणपणे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असतात. यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असतो. ह्या वयोगटातील मुलांच्या शारिरीक व बौध्दीक विकासासाठी सकस आहाराची (500 कॅलरीज् + एकुण 10 ते 12 गॅम प्रोटीन / प्रति दिन) अत्यंत आवश्यकता असते. तो त्यांना न मिळाल्यास ह्या वयात कुपोषण होऊन त्यांचा शरिरीक व बौध्दीक विकास खुंटला जातो. त्यानंतरच्या वयात तो भरून निघणे अवघड असते. या बाबीचा विचार करून महानगरपालिकेतील बालवाडीतील मुलांना "पोषण आहार" चालु करणे गरजेचे आहे.

1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेचा फायदा मिळतो पण बालवाडीसाठी सध्यातरी कुठलीही योजना नाही. काही मनपाच्या शालेय इमारतीत बालवाडीचे वर्ग चालतात तेथील बालवाडीच्या विद्यार्थ्यांना शाळेतील अनुपस्थित विद्यार्थ्यांचा उरलेला आहार दिला जातो, तो नेहमी पुरेसा नसतो. ज्या बालवाड्यात शालेय इमारतीच्या बाहेर म्हणजे विविध स्लम भागात आहे त्यांना कुठलाही पोषण आहार मिळत नाही. अशा प्रकारे पोषण आहारात तफावत आहे. ती तशी न राहता सर्वांना पुरेसा व त्यांच्या हक्काचा आहार मिळाला पाहीजे यासाठी महानगरपालिकेच्या 1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार हा इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशन, मुंबई यांच्यामार्फत देण्यांत येतो. तो अत्यंत चांगला, स्वच्छ व गरम असा असतो. याच धर्तीवर इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनाचा पोषण आहार बालवाड्यांसाठी मागील दोन वर्षापासून देण्यात येत आहे. पोषण आहाराचा दर्जा चांगला असल्याकारणाने सन 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी इस्कॉन फुड फाउन्डेशन या संस्थेस मुदतवाढ देण्यासंबंधी प्रस्तावित करण्यात येत आहे.

बालवाडी पोषण आहारास लागणारे साहित्य (तांदुळ, दाळ,भाज्या, तुप, मसाला इत्यादी) उपलब्ध करून घेणे, तो शिजवणे, तो बालवाडीपर्यंत पोहचवणे अशी संपूर्ण जबाबदारी ही त्यांच्यावर असेल. ह्या संपूर्ण जबाबदारीसाठी महानगरपालिकेने रू.5.50/- प्रति दिन/प्रति लाभार्थी असे दर ठरविले आहेत.

त्याप्रमाणे 3360x5.50 = **रू.18,480/-** प्रति दिन.

एकुण वर्षभरात सुट्या सोडून अंदाजे 210 कार्य दिवस संबंधीतास पोषण आहार द्यावा लागतो. 210x18,480 = **रू.38,80,800/-** एवढा खर्च संपूर्ण वर्षासाठी येईल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 66 मध्ये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतुद करता येईल, अशा बाबीमध्ये पोट नियम (3) नुसार शाळकरी मुलांसाठी दुधाची तरतुद करणे याबाबीचा समावेश आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 66 मध्ये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतुद करता येईल, अशा बाबीमध्ये पोट नियम (3) नुसार शाळकरी मुलांसाठी दुधाची तरतुद करणे या बाबीचा समावेश आहे.

बालवाड्यांतील विद्यार्थ्यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असा आहे, त्यांना जरूरी उष्मांक मिळण्यासाठी पुरक आहाराची गरज आहे. त्यामुळे दुधा ऐवजी मनपा बालवाडीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे बाबत मा.सर्वसाधारण सभा दिनांक 18/10/2012 ठराव क्र.906 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2(2) नुसार सन 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषण आहार योजनेस लागणारा एकुण खर्च रू.38,80,800/- (अंदाजित) खर्चाच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.त्र्यंबक तुपे : इस्कॉन तर्फे उत्तम प्रतीचा पोषण आहार पुरविला जातो. संस्थेने दि.17/11/2014 च्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार पोषण आहारासाठी आवश्यक असलेल्या साहित्याचे दरवाढीचा विचार करून प्रति लाभार्थी रू.5.50 ऐवजी 6.20 रूपये प्रमाणे करावेत. संस्थेच्या मागणीचा विचार करून वाढीव दरास मान्यता द्यावी.

मा.सभापती : स.सदस्य श्री.त्र्यंबक तुपे यांनी सांगितल्याप्रमाणे पोषण आहारासाठी लागणाऱ्या साहित्याचे दरवाढीचा विचार करता प्रति लाभार्थी रू.5.50 या दराऐवजी 6.20 रूपये प्रमाणे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

श्री.फिरदोस फातेमा खान:हा खर्च महिला बाल कल्याण समिती मार्फत दिला जातो.दोन्हीकडूनही खर्च अदा होवू नये.

श्री.मीर हिदायत अली :डबल पेमेन्ट दिले जाते का ?

श्री.त्रिंबक तुपे :डबल पेमेंन्ट जावू नये. समितीच्या माध्यमातून हा खर्च दिला काय ?

उपआयुक्त (प्र) :दोन वेळेस पेमेन्ट दिले जात नाही.महिला व बाल कल्याण समिती कडून खर्च दिला जातो.

श्री.त्रिंबक तुपे :विषय मंजूर करावा.

मा.सभापती :दोन वेळेस पेमेन्ट होवू नये. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या 148 बालवाड्यामधील एकुण 3,360 विद्यार्थ्यांना 1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारा शालेय पोषण आहार चांगल्या प्रतीचा असून याच धर्तीवर इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनाच्या पोषण आहाराचा दर्जा चांगला असल्या कारणाने सन 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी इस्कॉन फुड फाउन्डेशन या संस्थेस मुदतवाढ देण्यास त्याचप्रमाणे इस्कॉन ही संस्था 2012 पासून सामाजिक बांधीलकीच्या जबाबदारीतून सदर कार्य करीत असल्याने व पोषण आहारासाठी आवश्यक असलेल्या साहित्याचे दरवाढीचा विचार करता प्रति लाभार्थी रू.5.50 या दराऐवजी 6.20 रूपये प्रमाणे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच मनपा बालवाडीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे बाबत मा.सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.906 दि. 18/10/2012 अन्वये मान्यतेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2 (2) नुसार सन 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषण आहार योजनेस लाणाऱ्या वाढीव खर्चास देखील सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 79 :**

महानगरपालिका प्राथमिक शाळा पडेगांव कॉलनी करीता श्री.नंदु छोटीराम वाणी, मालमत्ता क्र.11/5/pg-346 पडेगांव कॉलनी सर्व्हे नं.11 यांची इमारत ज्यामध्ये 14x8 फुट आकाराच्या सहा वर्गखोल्या असुन सन 1995 पासुन भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहे. सदरील इमारत भाडेतत्वावर घेतेवेळेस भाडे समितीने निश्चित केल्याप्रमाणे व झालेल्या करारानामानुसार रू.4560/- प्रतीमाह प्रमाणे भाडे अदा करण्यात येत आहे.

तथापी करानामातील अटीनुसार दर दोन वर्षाला नियमानुसार भाडे समिती निश्चित करील त्याप्रमाणे भाड्यात वाढ करण्यात येईल, त्यानुसार सदरील इमारतीचे भाडे सिध्दशिघ्र गणकानुसार रू.15,760/-

काढण्यात आले असून सदरील भाडे बाबत दि.08/08/2014 रोजी सुनावणी घेऊन (उपआयुक्त सिडको व महसूल यांचे दालनात) वाटाघाटी करण्यात आली.

वाटाघाटीनुसार रू.13000/- (रूपये तेरा हजार फक्त) दर माह सन 2014-15 या वर्षापासून भाडे निश्चित करण्यात येणार आहे.

करीता मा.स्थायी समिति सभेसमोर भाडेवाढीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका प्राथमिक शाळा पडेगांव कॉलनी करीता श्री.नंदु छोटीराम वाणी, मालमत्ता क्र.11/5/pg-346 पडेगांव कॉलनी सर्व्हे नं.11 यांची इमारत ज्यामध्ये 14x8 फुट आकाराच्या सहा वर्गखोल्या सन 1995 पासुन भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या असल्यामुळे, सदरील इमारत भाडेतत्वावर घेतेवेळेस भाडे समितीने निश्चित केल्याप्रमाणे व झालेल्या करारानामानुसार रू.4560/- प्रतीमाह प्रमाणे भाडे अदा करण्यात येत आहे.

तथापी करानामातील अटीनुसार दर दोन वर्षाला नियमानुसार भाडे समिती निश्चित करील त्याप्रमाणे भाड्यात वाढ करण्यात येईल असे ठरल्यामुळे, संबंधीत घर मालकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रू.13000/- (रूपये तेरा हजार फक्त) दरमाह सन 2014-15 या वर्षापासून भाडे निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(एम.ए.पठाण)**
**नगरसचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद